[Please visit our website with respect to FCA Proposals at "http://www.mahaforest.nic.in"]

परिशिष्ट

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

गोपनीय
स्पीड पोस्ट

क्र.कक्ष-१७/नोसेल/२/आय.डी.११३४६/३०५/०६-०७,
नागपूर ४४० ००१, दिनांक : 13/6/2006

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.),
पुणे वनवृत्त,
पुणे.

विषय :- वन जमीन - पुणे
मौजे भांबुर्डा येथील सर्व्हे नंबर ८१ व ९४ मधील ०.७४४६ हेक्टर क्षेत्राचा वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गतचा प्रस्ताव. सिंम्बॉयसिस सोसायटी, पुणे.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र अ.शा. पत्र क्र.कक्ष-१७/नोसेल/२/आय.डी.११३४६/३२१/०६-०७, दिनांक ३१/५/२००६

विषयांकित प्रकरणी या कार्यालयाचे संदर्भिय पत्रास अनुलक्षून आंपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रात खालील मुद्यांच्या समावेश करण्यात येत असून त्यावर आपला खुलासा व स्पष्ट अभिप्राय या कार्यालयास त्वरीत कळविण्यात यांवा. या संबंधात प्रधान मुख्य वनसंरक्षक यांची आंपणास दूरध्वनीवरुन सदर प्रकरणी वन (संवर्धन) अधिनियम - १९८० च्या भंगाबाबत चर्चा झालेली आहे.

प्रस्तावित वनक्षेत्र हे उपवनसंरक्षक, पुणे यांचे कार्यालयासमोर असुन त्यावर संबंधीत यंत्रणेने अतिक्रमण केले असतांना उपवनसंरक्षक, पुणे यांनी बघ्याची भुमिका स्विकारली व आता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत त्या वन जमीनीचा वळतीकरणाचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. वास्तविकता सदर कृत्य हे पूर्णपणे वनभंग बाबतचे असल्यामुळे Symbiosis संस्थे विरुध्द न्यायालयात खटला दाखल करणे गरजेचे आहे. तसेच उपवनसंरक्षक, पुणे यांचे कार्यालयासमोर होत असलेल्या वनभंगाकडे दुर्लक्ष करणा-या उपवनसंरक्षक, पुणे व संबंधीत वन अधिकारी/कर्मचारी यांचेवर विभागीय चौकशी त्वरीत सुरु करण्यात यांवी. तसेच सदर प्रस्तावित (अतिक्रमित) जागेचे फोटो घेवून सर्व फोटोग्राफ त्वरीत या कार्यालयास पाठवावी. याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी मुख्य वनसंरक्षक, पुणे यांना दूरध्वनीवरुन सूचना दिलेल्या आहेत.

तरी आंपणास विनंती आहे की, सदर प्रकरणी उपरोक्त सूचनेप्रमाणे त्वरीत कार्यवाही करण्यात यांवी. व या वनभंगाबाबत आपले स्पष्ट मत नोंदवून आपला अहवाल या कार्यालयास पाठविण्याबाबत आंपणास कळविण्याचे मला आदेश आहेत.

WS 3603

13/6/06

मुख्य वनसंरक्षक व केन्द्रस्थ अधिकारी
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

Address: "VAN-BHAWAN", Civil Lines, Nagpur - 440 001 (M.S.)
E-mail:nodal.nep.mah@sanchar.net.in
Ph. : 0712-2556916 Fax : 0712-2550675